वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक : ०७ मे, २०२१

२. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

३. मा.आयुक्त सो यांचा दिनांक :१० /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/६७२/२०२४
दिनांक : १० /१०/२०२४

**विषय :- उपअभियंता (विद्युत) पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **उपअभियंता (विद्युत)** अभिनामाची पदे **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कनिष्ठ अभियंता (विद्युत)'** या पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता धारण केलेचे प्रमाणपत्र इ. सेवाविषयक तपशील पडताळून खालील कर्मचा-यांस मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून आणि कनिष्ठ अभियंता (वि) पदाचे सेवाज्येष्ठते बाबत मे.उच्च न्यायालय येथे प्रलंबित दावा क्र. WP/२१४५/२००५ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'उपअभियंता (विद्युत)'** पदावर **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **कनिष्ठ अभियंता (वि) कर्मचा-यांचे नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** | **पदोन्नतीने पदस्थापना द्यावयाचा विभाग** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | बनसोडे श्यामसुंदर प्रल्हाद | ज्येष्ठतेनुसार | फ क्षेत्रीय (विद्युत) |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन आणि कनिष्ठ अभियंता (वि) पदाचे सेवाज्येष्ठते बाबत मे.उच्च न्यायालय येथे प्रलंबित दावा क्र. WP/२१४५/२००५ चे अधिन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद अधिकारी यांना **'उपअभियंता (विद्युत)'** या पदावर **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नावासमोर नमूद केलेले प्रवर्गामधून आदेशाचे दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-

१) लेखा विभाग
२) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग
४) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४, संगणक कक्ष

१४.१०.२४
सहाय्यक आयुक्त .(साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.